# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०७/०५/२०२२ (शनिवार)**

**(दुपार)**

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. कुही** :— अंतर्गत २२ कि.मी अंतरावरील मौजा कुही फाटा येथे फिर्यादी नामे— शत्रुघ्न रंगराव गुजर, वय ७३ वर्ष रा. बिरसा नगर पो. सुरगाव ता. उमरेड जि. नागपुर यांचा मुलगा नामे— पवन शत्रुघ्न गुजर(जखमी), वय १९ वर्ष रा. बिरसा नगर पो. सुरगाव ता. उमरेड जि. नागपुर व आरोपी क्र २. बाल्या गुजर वय ३३ वर्ष दोन्ही रा. बिरसा नगर पो. सुरगाव ता. उमरेड जि. नागपुर यांचे ०२ वर्षा पुर्वी कोणत्यातरी कारणावरून झगडा—भांडण झाला होता. तेव्हा पासुन त्यांचे बोलचाल बंद होते. दिनांक ०७/०५/२०२२ चे १०.०० वा. ते १०.३० वा. दरम्यान आरोपी क्र १. खुशाल काकडे वय २३ वर्ष याने फिर्यादीच्या मुलास घराच्या बाहेर घेवुन हातबुक्कीने मारहाण केली व आरोपी क्र २ याच्या घरी घेवुन गेला. त्यावेळी आरोपी क्र. २ याने आपल्या घरातुन लोखंडी कोयता आणुन 'तुझे माझा बहीनीसी अनैतीक संबध आहे' या कारणावरून शिवीगाळ केली व लोखंडी कोयत्याने जिवानीशी ठार करण्याच्या उद्देशाने फिर्यादीच्या मुलास पायाला व हाताला गंभीर दुखापत करून जखमी केले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३०७,३२३,५०४,३४ भादवी सहकलम ४/२५ आर्म अक्ट अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री बोरकर हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**